RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक २९] गुरुवार, एप्रिल २३, २०२६/वैशाख ३, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ५०

प्राधिकृत प्रकाशन

कर्जत नगरपरिषद

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ सहकलम २३ (१) नुसार कर्जत नगरपरिषद क्षेत्राची भौगोलिक माहिती प्रणालीद्वारा (GIS) पहिली सुधारित विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेबाबत.

सूचना

जावक क्रमांक/१०२/२६-२७/क्रमांक १६, दिनांक २७/०३/२०२६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) व कलम ३८ अन्वये नगरपरिषद हद्दीतील क्षेत्राची भौगोलिक माहिती प्रणालीद्वारा (GIS) पहिली सुधारित विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करण्यासाठी यापूर्वी सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६, दि. २७/०३/२०२६ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार कर्जत नगरपरिषदेचा विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा कर्जत नगरपरिषद कार्यालय, नगररचना कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत माझेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

कर्जत नगरपरिषद.

तानाजी चव्हाण,
मुख्याधिकारी,
कर्जत नगरपरिषद,कर्जत.

KARJAT MUNICIPAL COUNCIL

Declaration of Intention to prepare Geographical Information System (GIS) 1st Revision Development Plan of Karjat Municipal Council as per Section 23(*1*) read with Section 38 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

NOTICE

जावक क्रमांक /103/26-27/Resolution No. 16, Date 27/03/2026.—Whereas, Karjat Municipal Council by its Resolution No. 16, Dated 27/03/2026 has given consent to declared its intention to prepare Geographical Information System (GIS) 1st Revision Development Plan as per provision of Section 23 (*1*) read with Section 38 of the of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Karjat Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to me within a period of 60(Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/ objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Karjat Municipal Council.

TANAJI CHAVAN,
Chief Officer,
Karjat Municipal Council.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.